**Series : AQ@QA**

**SET-4**

प्रश्न-पत्र कोड
Q.P. Code **8**

रोल नं.
**Roll No.** | | | | | | | | |

परीक्षार्थींनी उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर कोड नं. अवश्य लिहावा.
Candidates must write the Q.P.Code on the title page of the answer-book.

- प्रश्न-पत्रिकेत **8** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्न-पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर लिहा.
- प्रश्न-पत्रिकेत **5** प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक अवश्य लिहा.**
- प्रश्न-पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न-पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न-पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये.

- Please check that this question paper contains **8** printed pages.
- Q.P. Code given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **5** questions.
- **Please write down the Serial Number of the question in the answer-book before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the candidates will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

*

# मराठी
# MARATHI

*वेळ : **2** तास* — *गुण : **40***

*निर्धारित समय : **2** घंटे* — *अधिकतम अंक : **40***

*Time allowed : **2** hours* — *Maximum Marks : **40***

1. खालील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

जोतीराव – सावित्रीबाईंनी स्वत:च्या घरात एक वसतिगृह चालविले होते. दूरदूरच्या ठिकाणाहून मुले शिक्षणासाठी तिथे येत असत. लक्ष्मण कराडी जाया ह्या मुंबईच्या विद्यार्थ्याने या वसतिगृहात राहून सावित्रीबाईच्या मायेची पाखर अनुभवली होती. त्यानी आठवणीत म्हटले आहे की, "सावित्रीबाईंसारखी दयाळू व प्रेमळ अंत:करणाची स्त्री मी अजूनसुद्धा कोठे पाहिली नाही. त्या आम्हा मुलांवर आईपेक्षासुद्धा जास्त प्रेम करीत असत." एका मुलाने आपल्या आठवणींमध्ये सावित्रीबाईंचा स्वभाव, त्यांची विलक्षण हृद्ध नोंद केली आहे. हा महादू सहादू वाघोले लिहितो, "सावित्रीबाईं फारच उदार होत्या. त्यांचे अंत:करण दयेने भरलेले होते. गोरगरिबांवर त्या फार दया करीत. त्या अन्नदान पण फार करीत. त्या कोणासही जेवू घालीत. गरीब बायांची अंगावरची फाटलेली लुगडी पाहून त्यांना त्या आपल्या घरातली लुगडी देत. त्यामुळे तात्यांचा खर्च फार होत असे. एखादे-वेळी तात्या त्यांना म्हणत, "इतका खर्च करू नये." त्यावर त्या शांतपणे बारीक हसत असत व "बरोबर काय न्यायचे आहे ?" असे तात्यांना विचारीत असत. त्यावर तात्या शांत मुद्रेने थोडावेळ गप्प बसत असत. ते दोघे एकमेकांवर अतिशय प्रेम करीत असत."

सावित्रीबाईंचा पोशाख तात्यांप्रमाणेच अगदी साधा असे. त्यांच्या अंगावर अलंकार नसत. त्यांच्या गळयात एक पोत व मंगळसूत्र असे. कपाळावर भलेमोठे कुंकू लावलेले असे. सावित्रीबाई सुविचारी व दूरदृष्टीच्या होत्या. त्यांच्याविषयी आप्तजनांत मोठा आदर होता. त्यांना स्त्रीजातीच्या उन्नतीची फार कळकळ असे. मुलींच्या शाळांतून त्यांनी शिक्षिकेचे काम केलेले असल्यामुळे स्त्रीशिक्षणाचा विस्तार झाल्यानंतर सुशिक्षित बायांत त्यांच्याविषयी पूज्यभाव वाढलेला दिसत होता. त्यांच्याकडे आलेल्या मुलींना व स्त्रियांना त्या नेहमी सदुपदेश करीत असत.

1. (अ) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. **4**

(१) जोतीराव व सावित्रीबाईंनी वसतिगृह कां चालविले होते ?

(२) सावित्रीबाईंचा दयाळूपणा कोणत्या प्रसंगातून व्यक्त होतो ?

(३) सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्वाचेवर्णन कोणत्या शब्दांत केले आहे ?

(ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाबद्धल तुमचे विचार व्यक्त करा. **3**

(१) "बरोबर काय न्यायचे आहे ?" असा प्रश्न जोतिबांना विचारणाऱ्या सावित्रीबाईंना काय सुचवावयाचे, असावे असे तुम्हाला वाटते ?

(२) सावित्रीबाईंच्या कार्याचा समाजातील स्त्रियांवर कोणता परिणाम होत असे ?

2. (अ) खालील प्रश्नांची सुमारे ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही २) **4**

(१) आत्मचरित्राने स्वत:ची ओळख कोणत्या शब्दांत करुन दिली ?

(२) डॉ. माशेलकरांनी चाचणी परिक्षेसंदर्भातील कोणती आठवण सांगितली आहे ?

(३) रेल्वेचे वेडेवाकडे रूळ पाहून निरंजनच्या मनामध्ये कोणते विचार आले ?

(४) पाठाआधारे कविता या साहित्यप्रकाराची ओळख तुमच्या शब्दांत करुन दया.

(ब) खालील प्रश्नांची सुमारे ५० ते ६० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही २) **6**

(१) आपले व्यक्तिमत्व घडण्यामध्ये शाळेचे स्थान, याबाबतचे तुमचे विचार स्पष्ट करा.

(२) 'रंग साहित्याचे' या पाठामध्ये कोणकोणते साहित्य प्रकार सांगितले आहेत ? त्यापैकी एका प्रकारची वैशिष्टये थोडक्यात लिहा.

(३) अभ्यासक्रमातील नागरिकशास्त्र या विषयाचे तुम्हाला जाणवलेले महत्त्व या पाठाआधारे स्पष्ट करा.

3. (अ) खालील प्रश्नांची सुमारे ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही २) **4**

(१) 'स्वप्न करु साकार' या कवितेत कवीने देशातील एकतेचे वर्णन कोणत्या शब्दांत केले आहे ?

(२) 'औक्षण' कवितेतील कवयित्रीच्या मनातील सैनिका बद्दलची कृतज्ञतेची भावना स्पष्ट करा.

(३) सैनिकांच्या कर्तुत्वापुढे इंदिरा संतांना जाणवलेले स्वत:चे सामान्यत्व तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(ब) खालील पद्यपंक्तीचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा. (कोणतेही १) **3**

(१) तुझ्या विजयाची दौड
डोळे भरुन पहावी,
डोळ्यातील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी

(२) फुलाफुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार ।।

(क) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे ५० ते ६० शब्दांत उत्तर लिहा. **3**

(१) व्युत्पत्ति म्हणजे काय ते सांगून व्युत्पतिकोशामध्ये कोणती माहिती सांगितली आहे ?

(२) मराठीभाषेतील 'आग' शब्दाबद्दल व्युत्पत्तिकोशामध्ये कोणती माहिती सांगितली आहे ?

4. (अ) कंसातील सूचनांनुसार उत्तरे द्या (कोणतेही १) **2**

(१) माझ्या मैत्रिणीला सारंगने मदत केली.

(वाक्यातील नामे ओळखून प्रकार लिहा.)

(२) मुलांनी आपली काळजी घेतली. आपला प्रवास सुखाचा झाला.

(योग्य उभयान्वयी अव्ययाचा वापर करुन वाक्य पुन्हा लिहा.)

(३) कार्यक्रमामध्ये श्री. जोशी यांनी सर्व कवींचा सन्मान केला.

(वाक्यातील सामान्यनामाच्या विरुद्धलिंगी शब्दाचा पर्याय वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

(ब) कंसातील सूचनेनुसार बदल करुन लिहा. (कोणतेही १) **2**

(१) स्मिता कविता लिहिते. (वाक्याचा काळ ओळखून या वाक्याचे भूतकाळात रूपांतर करा.)

(२) हर्षदने गाणे गाईले. (वाक्याचा काळ ओळखून या वाक्याचे भविष्यकालीन रूपांतर करा.)

(३) पहाटे खूप थंडी वाजेल. (वाक्याचा काळ ओळखून वर्तमानकालीन रूपांतर करा.)

(क) कंसातील सुचनेनुसार बदल करुन लिहा. (कोणतेही १) **2**

(१) सर्वांनी आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. (वाक्याचा प्रकार ओळखा आणि आज्ञार्थी वाक्यात रूपांतर करा.)

(२) तू आज कामावर येशील का ?

(वाक्याचा प्रकार ओळखून विद्यानार्थी वाक्यांत रूपांतर करा.)

(३) आज तू स्वयंपाक कर. (वाक्याचा प्रकार ओळखून प्रश्नार्थक वाक्यात रूपांतर करा.)

(४) हे मंदिर अतिशय भव्य आहे.

(वाक्याचा प्रकार ओळखून उद्‌गारवाचक वाक्यात रूपांतर करा.)

(ड) खालील सामाजिक शब्दांचा योग्य विग्रह करुन समास ओळखा. (कोणतेही १) **2**

(१) आजन्म

(२) नवरात्र

(३) भाजीपाला

5. खालीलपैकी कोणतेही **एक** पत्र लिहा. (लिफाका आवश्यक) **5**

श्री. मिलींद नेवासकर, मंगल पुस्तक भांडार, आळंदी पुणे येथून प्रकाशकाने पाठविलेली पुस्तके मागणीपेक्षा कमी असल्याची तक्रार करणारे पत्र प्रकाशक–स्नेहल प्रकाशन, मेन बाजार रोड, औरंगाबाद यांना लिहित आहे.

**किंवा**

श्री स्वप्नील गायकवाड, कल्पतरु सोसायटी, पुणतांबे, जि. अहमदनगर येथून संजय खेळणी भांडार, महाद्वार रोड, कोल्हापूर यांना दिलेल्या यादीप्रमाणे खेळण्यांची मागणी करीत आहेत असे पत्र लिहा.

---

*